# 'साय-फाय करंडक'च्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन

## क्विक हील फाऊंडेशन, थिएटर अकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलिस यांचा संयुक्त उपक्रम

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) : क्विक हील फाऊंडेशन, थिएटर अकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलिस यांचा संयुक्त उपक्रम 'साय-फाय करंडक'साठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे. कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर फोन करा किंवा theatreacademypune@gmail.com ला मेल करा. अधिक माहितीसाठी कृपया www.cyfiarts.com या संकेतस्थळाला भेट द्या.

साय-फाय करंडक २०१७च्या पहिल्या आवृत्तीत १०० पेक्षा अधिक टीमनी सहभाग नोंदवत ही स्पर्धा यशस्वी केली होती. थिएटर अकॅडेमी

Quick Heal

*Security Simplified*

आपले अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध नाट्यकर्मी श्री. प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कान्या-कोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल. या टीम अशा समकालीन विचारप्रवण एकांकिका सादर करतील, ज्यांमध्ये डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल. साय-फाय करंडकाच्या माध्यमातून क्विक हील फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य पोलिसची सायबर सुरक्षा जागरूकता आणण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रयोग करून एक सुरक्षित सायबर विश्व उभे करण्याची वचनबद्धता व्यक्त होते. साय-फाय करंडक २०१८ मध्ये अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका १६ डिसेंबर २०१८ रोजी ग्रँड फिनालेमध्ये सादर होतील व त्यावेळी या कलाकारांना नाटक, सिनेमा आणि टीव्हीवरील मान्यवर कलाकारांच्या ज्यूरी पॅनलसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर म्हणाले, '२०१८ च्या या एकांकिकांच्या स्पर्धात्मक उत्सवासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पोलिस आणि थिएटर अकॅडेमीशी सहयोग केला आहे, जे या उत्सवातील सर्व प्रक्रियांमध्ये सहाय्य करतील. या वर्षी आम्ही महाराष्ट्रातील अधिक व्यापक क्षेत्रांतून प्रवेशिका मागवल्या आहेत ज्यामुळे ठिकठिकाणचे नाट्य कलाकार आणि विविध विषय सामील होऊ शकतील. आम्हाला खात्री आहे की, या उत्सवामुळे सहज प्राप्य आणि सुखद अशा डिजिटल विश्वाशी संबंधित धोके लोकांच्या ध्यानात येतील.'